# पुरू: हिंदुस्थानी इतिहासाचा मानबिंदू

हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळून साठ वर्षे होऊन गेली. इतिहासाचे नीट संकलन व्हावे असे ज्या ज्या व्यक्ती,संस्था, मंडळे यांना वाटत असेल त्यांनी अलेक्झांडरच्या इथल्या अठरा महिन्यांतील वास्तवाचे सपशेल पराभावाचे संकलन करण्यासाठी इस्त्रो, मरीन आर्किओलॉजी, एक्स–रे सीस्मोग्राफी इत्यादी साधनांनी हिंदुस्थानचे पाऊल उचलावे असा आग्रह धरला पाहिजे.

अलेक्झांडर हा हिंदुस्थानी इतिहासाच्या संदर्भातला पुरू व इतर हिंदुस्थानी राजांच्या हातून सपशेल पराभूत झालेला व झेलमच्या किनाÚयावरून पळून गेलेला सम्राट (?) आहे. हिंदुस्थानी राजांच्या व जनतेच्या सुसूत्रित पराक्रम व त्यागाची ही यशोगाथा आहे. जेमतेम सतरा हजार मॅसिडोनियन वंशाचे सैनिक त्याच्यासाठी लढाईला कसेबसे उभे राहिले. ज्यांना परकीय इतिहासकार मर्सिनरीज समजतात हे इतर वंशाचे सैनिक (हिंदुस्थान,अरब,इजिप्शियन) त्याच्या बाजून लढले नाहीत ते त्याच्या तक्षशिलेतील पाच महिन्यांच्या वास्तव्यात एकतर पळून गेले वा आर्यचाणक्य–चंद्रगुप्त व राजपुत्र अंभीच्या प्रयत्नामुळे पुरूला मिळाले. प्लूटार्क, एरियन कर्टिस (यस) डिओडोरस यांच्या नोंदीवरून ही गोष्ट समजू शकते. त्यांच्या नोंदीवरून हेही समजते की, युध्दाअगोदर हे सैनिक पंधरा ते बावीस तासांची पायपीट करून, पोहून, पुरूपुत्राशी लढून व तेही झेलमच्या पश्चिमेकडील प्रदेशात भयंकर पाऊस, चिखल यातून आपल्या उपाशी जनावरांसह लढाईसाठी आले. शरीरशास्त्र, युध्दशास्त्र भौगोलिक परिस्थिती यात त्याचे टाइमटेबल, प्रशासन, पुरवठा नियोजन निकालात निघाले, पुरूच्या अनुभवी युध्दकौशल्य व डावपेचापुढे अलेक्झांडर अगदीच फिका पडला.

तो नक्की इथे कशासाठी आला याबद्दल ग्रीकांनाच नीट समजलं नाही. साम्राज्य स्थापण्यासाठी जर तो इथे आला तर आपल्या सैनिकांची मने त्याला समजू शकली नाहीत. ते इथे तो असताना व परतीच्या वेळी व नंतरही त्याच्याविरूध्द बंड करत होते. (ग्रीक नोंदी)

अलेक्झांडरच्या इथल्या वास्तव्याचे वस्तुनिष्ठ संशोधन स्कॉटलंड यार्डच्या धर्तीवर का करू नये अशा संशोधनाला लावणारी आधुनिक उपकरणे, तज्ज्ञ, सुविधा, भांडवल उभारणी हिंदुस्थानला कारणे अजिबात कठीण नाही. कारण हे सर्व इथे आहेच. एज्यु. सॅट कार्यक्रमासाठी इस्त्रो उपग्रह उपलब्ध आहे सरस्वती नदी संशोधनासाठी त्याचा उपयोग झाला आहे. राजकीय इच्छाशक्तीचे आर्थिक पाठबळ मिळणे आवश्यक आहे. असं संशोधन करायचं झालं तर त्याची सुरूवात अफगाणिस्तान, सिंध, पंजाब, अशी होईल. हे तीनही भूप्रदेश हिंदुस्थानच्या ताब्यात नाहीत हे कारण खरे नाही. 1971 साली हिंदुस्थानने

अफगाणिस्तान सरकारने (वार्मियान) बुध्दांचे व चित्रगुफांचे संशोधन व जतन करण्यासाठी सुमारे तीस तज्ज्ञांना तिथे पाठवले होते. ही मंडळी तिथे तीन वर्षे राहिली होती व या जतन कार्यक्रमावर हिंदुस्थानने अफगाणिस्तानला तो स्वखर्चाने देऊ केला होता. त्यावेळी अफगाणिस्तान हे हिंदुस्थानचे मित्रराष्ट्र नव्हते. तेव्हाही हिंदुस्थानात येणारे अमली पदार्थ अफगाणिस्तान, पाकिस्तान मार्गेच येत. तेव्हा जर हिंदुस्थानच्या परराष्ट्र संबंधावर विपरीत परिणाम झाला नव्हता तर आज येण्याचे कारण काय ?


पाकिस्तानी व अफगाणिस्तानी ही हिंदुस्थानी वंशाची माणसे आहेत. पूर्वीचे अश्वाक, कठ, योधय, शिबी, मालव हेच या राष्ट्रांचे पूर्वज आहेत हे त्यांनाही ठाऊक आहे.

अशा संशोधनाची सुरूवात अफगाणिस्तानच्या हिंदुकुशपासून सुरू होणाÚया काओशान(कुशन), खवाक, काबूल, कंदहार(कंधार), पेशावर, पुष्कलावती तक्षीला (तक्षशिला), सिंधू नदीचे खोरे, झेलम नदी, कारी रणभूमी पश्चिम व पूर्व किनारा (हरणपूर झेलमचा यूटर्न) झेलम सिंधू संगम अलेक्झांडरने न लढता केलेली अविश्रांत दहा महिन्यांची पळापळ, पंजाब–सिंध या भूमी, नदी, वाळवंटे, मकरान, बंदराचा पलायन मार्ग, इस्त्रो उपग्रह छायाचित्रणाने जाणून घ्यायचा झाला तर इतिहास व भूगोलचे वस्तुनिष्ठ परिक्षण आपल्याला काय सांगेल ?

1) अलेक्झांडर विजयी झाला असता तर तो तक्षशिला नगरीमार्गे हिंदुकशट्रेड रूट करून तक्षशिला नगरीत परत राजपुत्र अंभीचा पाहुणचार घेऊन गेला असता.

2) त्याच्या विजयाची स्मृतीचिन्हे, नाणी, तक्षशिलेत मिळाली असती. यांच्या कॉइन्स या पुस्तकात तशी नाणी विशेषतः त्याच्या हत्तीला हाकलणाÚया ग्रीक सैनिकांचे सुवर्ण नाणे खरे नाही असा उल्लेख आहे.

3) अलेक्झांडरच्या मृत्यूची कारणे स्कॉटलंड यार्डला त्याच्या अलेक्झांड्रियातील थडग्यात जी मिळाली त्यात त्याच्या कवटी व सांगडयाचे निरीक्षण हिंदुस्थानातल्या हत्ती, मालन व सिंधू– झेलम किनारा व मकरान प्रदेशाच्या टोळी राज्यांशी झालेल्या संग्रामातील जबरदस्त मनुष्यहानी, हालअपेष्टा, उपासमार यांच्याशी जुळणारे आहे.




हीं पळापळ दहा महिन्यांची, पुरूशी कारी रणभूमी या दोनशे फूट उंचीच्या टेकडीखालील कठीण भूपृष्ठावर (माळ झालेली त्याच्या अकरा ते सतरा हजार सैन्याची विशेषतः त्याच्या सैनिक व जनावरांना बावीस तास अविश्रांत करावी लागलेली वाटचाल, पोहून जाण्याची खटपट व दबा धरून त्याच्या थकल्या भागल्या सैनिकांवर तुटून पडणारे स्वतःची जागी स्थिर राहून ग्रीक सैनिकांचा फडशा पाडणाÚया हिंदुस्थानी सैनिकांचे, दोन्ही बाजूंच्या मृत सैथ्नकांचे अवशेष

सापडतील. ग्रीक सैनिकांची शस्त्रे, पोशाख हिंदुस्थानी सैनिक, पूर्ण वगळे होते. मृत सैनिकांची शस्त्रे, पोशाख, पादत्राणे सिंधू नदी ते मकरान अफगाणिस्तान व पार्शियाला परत जातान बुडालेली जहाजे मद्य कुंभ याचा निश्चित स्वरूपाचा छडा लागेल, त्याची संगती लावता येईल.

सांस्कृतिक संबंधाचे जतन करण्याची अफगाणिस्तान, पाकिस्तान व हिंदुस्थान यांची जर खरंच तशी गरज असेल तर इस्त्रोचे उपग्रह चित्रण ही हेरगिरी नसून सांस्कृतिक संबंध जपण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे हे त्यांना पटेल. पाकिस्तान व अफगाणिस्तानचा इतिहास हिंदुस्थानहून वेगळा नाही. अलेक्झांडर जितका हिंदुस्थानचा शत्रू होता तितकाच्या त्यांचाही गांधार तक्षशिला हिंदुकुशही पाकिस्तानची पूर्वज राष्ट्रे व संस्कृती आहे.

असे सहकार्य जर खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात आले तर त्याच्या खर्चाची तरतूदही सामायिक असेल. युनेस्को, नासा, फ्रान्स, जपान अशी राष्ट्रे व संस्थांचे आर्थिक पाठबळ या प्रकल्पाच्या पाठीशी उभे राहील. हिंदुस्थानने असा प्रोजेक्ट तयार करून घ्यावा. इथल्या तज्ज्ञ संस्था, तंत्रज्ञ यांची निवड इथले स्पॉन्सर्स, कार्यवाही मुदत यांचे वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करून घ्यावे. इजिप्तसारखे औद्योगिक आर्थिक व संघटना या दृष्टीने कमकुवत व हिंदुस्थानच्या संदर्भात मागे असणारे राष्ट्र जर असा विचार अमलात आणते तर हिंदुस्थानला हा प्रयत्न करून पाहायला कसलीच अडचण येणार नाही.

– – –